# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ३०/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## मोटर सायकल चोरी करणारे अट्टल गुन्हेगार गजाआड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—



नागपुर ग्रामिण जिल्हयात मोटरसायकल चोरींच्या घटना वाढत असल्याने त्यावर आळा घालण्या करीता मा. पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामिण यांनी दिलेल्या सुचने वरून पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांनी त्याकरीता विशेष पथक स्थापन केले होते. आज दिनांक ३०/०९/२०२२ रोजी सदर पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस ठाणे रामटेक परिसरातुन संशयीत इसम नामे १) प्रितम केशव मेंढे, वय २६ वर्ष व २) विलास रामाजी बघेले, वय २२ वर्ष, दोनही राहणार. हमलापुरी त. रामटेक जि. नागपुर यांना ताब्यात घेतले. त्यांनी विचारपुस दरम्यान सदर मोटर सायकलींची चोरी ही मौजमस्ती करीता पैशांची आवश्यकता असल्याने चोरी केल्याचे सांगीतले. त्यानुसार त्यांनी नागपुर ग्रामिण तसेच नागपुर शहर येथुन एकुण ४ मोटर सायकली चोरी केल्याचे सांगीतले. त्यांचे ताब्यातुन पोलीस ठाणे पारशिवनी येथुन चोरी केलेल्या २ मोटर सायकल, पोलीस ठाणे अरोली येथुन चोरी केलेली १ मोटर सायकल तसेच नागपुर शहर पोलीस ठाणे हद्दीतुन चोरी केलेली १ मोटर सायकल अशा एकुण ४ मोटर सायकली किं. २,००,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करून नमुद दोनही आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील तपास कामी पोलीस ठाणे पारशिवनी यांचे ताब्यात दिलेले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन पारशिवनी करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण चे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, राजेंद्र रेवतकर, पोना रोहन डाखोरे, विपीन गायधने, अमोल वाघ चालक अमोल कुथे व सायबर सेल चे सतिष राठोड यांचे पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर